टीव्ही अभिनेता समीर शर्माने केली आत्महत्या

मुंबईत राहत्या घरी गळफास घेऊन केली आत्महत्या

मुंबई : टीव्ही अभिनेता व मॉडेल समीर शर्मा याने मुंबईतील मालाड इथल्या राहत्या घरी आत्महत्या केली. ४४ वर्षीय समीरने गळफास घेऊन आत्महत्या केली. समीरच्या घरातून कोणतीच सुसाइट नोट मिळालेली नाही. समीरने बऱ्याच हिंदी मालिकांमध्ये भूमिका साकारल्या होत्या. 'ज्योती', 'कहानी घर घर की', 'लेफ्ट राइट लेफ्ट', 'इस प्यार को क्या नाम दूँ' या मालिकांमध्ये समीरने महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या होत्या. मालाड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नाइट ड्युटीवर असलेल्या इमारतीच्या वॉचमनने आधी समीरचा मृतदेह पाहिला. त्यानंतर त्याने पोलिसांना व सोसायटीच्या सदस्यांना याविषयीची माहिती दिली. समीरने दोन दिवसांपूर्वीच आत्महत्या केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

"आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्याता आला आहे", अशी माहिती मालाड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस अधिकारी जॉर्ज फर्नांडिस यांनी दिली.

फेसबुक लाईव्ह करत हॉटेलमध्ये काम करणाऱ्या २२ वर्षीय युवकाची आत्महत्या

जव्हार - शहरातील राममंदिर शेजारील इमारतीत एका 22 वर्षीय तरुणाने फेसबुक लाईव्ह सुरू ठेवून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी सायंकाळी पाच च्या सुमारास घडली आहे.वाडा तालुक्यातील वीरा येथील नवनाथ बोगे वय 22 हा तरुण जव्हार येथील एका हॉटेल मध्ये वेटरचे काम करत होता, तो हॉटेल मालकाच्या फ्लॅटमध्ये रहायचा अचानक त्याने फेसबुक सुरू करून स्वतः पंख्याला बांधलेल्या नायलॉन दोरीला लटकून लाईव्ह आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली असून, सदर घटना कॅमेऱ्यात कैद झाली असून ती सोशल मीडियावर पसरल्यामुळे घटनेची खबर लागली आहे. आत्महत्या का केली याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही, दरम्यान जव्हार पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली आहे.

'कस्तुरबा'त उभारणार आंतरराष्ट्रीय दर्जाची

साथरोग आजार व प्रतिकारशक्ती शास्त्र संशोधन संस्था!

भविष्यातील साथरोगाचाही घेणार वेध १२ कोटी ७४ लाख खर्च

मुंबईः करोनाच्या साथीने संपूर्ण जगाला हादरवून सोडले आहे. भारताला त्यातही महाराष्ट्राला याचा सर्वाधिक फटका पडला असून सर्वाधिक रुग्ण व मृत्यू महाराष्ट्रात झाले आहेत. या पार्श्वभूमीवर करोनासह विविध साथरोग आजार, रुग्णामधील प्रतिकाशक्ती, जनुकीय बदल, प्रतिपिंडासह उपचाराची दिशा आदींसदर्भात संशोधन करण्यासाठी महापालिकेच्या कस्तुरबा रुग्णालयात आंतरराष्ट्रीय दर्जाची 'साथरोग आजार व प्रतिकारशक्ती शास्त्र संस्था' स्थापन करण्यात येणार असून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या प्रस्तावित संशोधन संस्थेला तत्वतः मान्यता दिली आहे. पहिल्या टप्प्यात यासाठी १२ कोटी ७४ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यापूर्वी मुलुंड येथे पाच हजार बेड क्षमता असलेल्या साथरोग व सुपर स्पेशालिटी रुग्णालयाची घोषणा केली आहे तसेच राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी साथरोग रुग्णालय उभारण्याची भूमिका घेतली आहे. याचबरोबर भारतीय लोकांची प्रतिकारशक्ती व क्षमता, भारतातील आजार, जलजन्य आजार, प्लाझ्मा उपचार, अँण्टिबॉडी,टी सेल प्रतिकारशक्ती, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय साथरोग, करोना तसेच आगामी काळातील आजारांचा सामना करण्यासाठी करावयाची तयारी आदीचा अभ्यास व संशोधन करण्यासाठी 'आयसीएमआर'चे सहसंचालक डॉ. ओम श्रीवास्तव यांनी राज्य शासनाला रुग्णालयाशी संलग्न असलेली आंतराराष्ट्रीय दर्जाची संशोधन संस्था स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. गेल्या आठवड्यात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे झालेल्या प्रमुख अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर्स यांच्या बैठकीत आयसीएमआर'चे सहसंचाल कडॉ. ओम श्रीवास्तव यांनी या नियोजित संशोधन संस्थेची माहिती सादर केली होती. मुख्यमंत्री ठाकरे यांनी या प्रस्तावाला तत्वतः मान्यता दिल्यानंतर डॉ. श्रीवास्तव यांनी सोमवारी हा प्रस्ताव राज्य सरकारला सादर केला आहे. राज्यात पुणे येथे अशाप्रकारची 'एनआयव्ही' ही संस्था असली तरी रुग्णालयाशी संलग्नता ठेवून व्यापक संशोधन व उपचारांची दिशा निश्चित करणारी नवी आंतरराष्ट्रीय दर्जाची संस्था लवकरच स्थापन होणार असल्याचे पालिकेतील एका ज्येष्ठ अधिकार्यांनी सांगितले. कस्तुरबा रुग्णालयातील या संशोधन संस्थेत अँण्टिबॉडी म्हणजे प्रतिपिंडाचा अभ्यास, टी सेल ज्यात शरीरातील विषाणू निष्क्रिय करण्याची क्षमता असलेली प्रतिपिंड, थुंकी, घसा तसेच लाळेतून घेतलेला द्रव, करोना व अन्य साथरोग आजारांवरील औषधे, विषाणू संसर्गावरील उपाययोजना, प्रतिकाशास्त्र, संसर्गजन्य आजार तसेच साथरोग आजारांवर व्यापक संशोधन केले जाणार आहे. यातून रुग्णामधील प्रतिकारशक्ती कशी विकसित करता येईल यावर प्रामुख्याने अभ्यास केला जाणार आहे. त्याचबरोबर अशा गोष्टींचा सामना करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील त्रुटी शोधून त्या दूर करण्यावर भर दिला जाणार आहे. वैद्यक क्षेत्रातील महत्वाच्या संशोधनावरही ही संस्था लक्ष ठेवून राहाणार आहे. यातील महत्वाचा भाग म्हणजे करोना झालेले काही रुग्ण हे गंभीर व तीव्र स्वरुपाची लक्षणे दाखवतात तर काहींना सौम्य स्वरुपात तो का होतो यावरील संशोधनातून कोवीड उपचार व प्रतिबंध तसेच लस निर्मितीची दिशा स्पष्ट होईल. हे संशोधन एका व्यापक पायावर उभे राहाणार असून यात सार्वजनिक आरोग्य, रुग्णालये, विद्यापीठे, आरोग्य विज्ञान विद्यापीठ, पशुवैद्यकीय विद्यापीठ, वैद्यकीय संशोधन संस्था, एपिडेमॉलॉजी म्हणजे प्रतिबंधात्मक शास्त्रासह वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञांना सामावून घेण्याचे डॉ. श्रीवास्तव यांच्या प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे.

पालिकेच्या कस्तुरबा रुग्णालयात यासाठी २००० चौरस फुटांची जागा पहिल्या

टप्प्यासाठी निश्चित करण्यात आली असून बांधकामासाठी ७५ लाख, दोन प्रयोगशाळांसाठी सहा कोटी, आवश्यक उपकरणे २५ लाख, आपत्कालीन खर्च एक कोटी तसेच संशोधक व अन्य कर्मचारी यांच्यासाठी चार कोटी ७४ लाख ६० हजार असा १२ कोटी ७४ लाख ६० हजार रुपयांचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. तीन वर्षांत ही संशोधन संस्था पूर्णत्वास आलेली असेल यात दुसर्या टप्प्यातील नऊ कोटी रुपयांचा समावेश आहे. विषाणू, जीवाणूसह साथरोगाचा सामना करण्यासाठी ही संशोधन संस्था मोलाची ठरेल तसेच भविष्यातील रुग्णांना याचा नक्की फायदा होईल, असा विश्वास या प्रस्तावात व्यक्त करण्यात आला आहे.

महापालिका आणि जिल्हा प्रशासनाने सतर्क राहावे

पालकमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

ठाणे : गेल्या दोन दिवसांपासून शहरासह जिल्ह्याला मुसळभधार पावसाने झोडपून काढले असले तरी परिस्थिती नियंत्रणात आहे. नागरिकांना कुठलाही त्रास होऊ नये, यासाठी महापालिका आणि जिल्हा प्रशासनाने सतर्क व तत्पर राहावे, असे आदेश ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी दिले. जिल्ह्यात पावसाची संततधार सुरू असून शिंदे यांनी या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. जिल्ह्यात एनडीआरएफची पथके तैनात केली असून गरज पडल्यास ठाणे महापालिकेची मदत पथकेही पाठवली जातील, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. शहरातील सखल भागांमध्ये काही ठिकाणी पाणी साचले आहे, परंतु पंप लावून या पाण्याचा उपसा केला जात आहे. झाडे पडल्याच्या तक्रारींची त्वरित दखल घेऊन पडलेली झाडे उचलण्याच्या सूचनाही शिंदे यांनी दिल्या. महापालिकेचा आपत्ती व्यवस्थापन कक्ष अद्ययावत असून आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांच्यासह मी स्वतः परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे, असेही शिंदे यांनी सांगितले.

करोनाचा प्रादुर्भाव नियंत्रणात शिंदे यांनी याप्रसंगी करोनासंदर्भातील परिस्थितीचाही आढावा घेतला. महापालिकेने केलेल्या उपाय योजनांमुळे गेल्या काही दिवसांपासून नव्या बधितांची संख्या घटत असून रुग्ण बरे होण्याचे प्रमाणही तब्बल ८४ टक्क्यांवर पोहोचले आहे. रुग्णसंख्या दुपटीचा कालावधीही सातत्याने वाढत आहे. मात्र, कुठल्याही परिस्थितीत गाफील राहून चालणार नाही. लॉकडाउन मध्ये बऱ्यापैकी शिथिलता दिली असून परिस्थिती अशीच राहिली तर आणखी काही निर्बंध मागे घेण्यासंदर्भात निश्चितपणे विचार केला जाईल, असे शिंदे यांनी सांगितले.

राष्ट्रवादीच्या वतीने मास्क, सॅनिटायझरचे वाटप

ठाणे (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या वाढदिवसाच्या अनुषंगाने राष्ट्रवादी घोडबंदर महिला ब्लॉकच्या वतीने कोविड योद्धयांना सॅनिटायझर आणि मास्क-ग्लोव्हजचे वाटप करण्यात आले.

गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी "माझा वाढदिवस साजरा करू नका शुभेच्छांचे बॅनर लावू नका, त्याऐवजी सामाजिक कर्तव्ये पार पाडा" असे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत शहराध्यक्ष आनंद परांजपे, प्रदेश चिटणीस तथा नगरसेवक सुहास देसाई, ओबीसी सेलचे नेते राज राजापूरकर, शहर उपाध्यक्ष दादासाहेब गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी घोडबंदर महिला ब्लॉक च्या अध्यक्षा रानी देसाई यांच्यातर्फे कासारवडवली, आनंद नगर, पाटलीपाढा एम एस ई बी कार्यालय, कासारवडवली पोलिस स्टेशन, वाघबीळ ट्रॅफिक पोलिस चौकी, ठामपा आरोग्य केंद्र, आणि ठामपा मुख्यालय येथे कार्यरत असलेले पोलिस, एम एस ई बी कर्मचारी, ठामपा सफाई कामगार, यांनाा मास्क, सॅनिटायझर आणि हॅन्डग्लोव्हजचे वाटप केले.

भिवंडीतील मानकोली चिंचोटी रस्त्याची चाळण

भिवंडी- भिवंडीतील मानकोली चिंचोटी महामार्गावर सध्या खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून अंजुरफाटा ते खारबावपर्यंत या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. या खड्डेमय रस्त्यांवरून वाहन चालवितांना वाहन चालकांना अनेक अडचणी येत आहेत . विशेष म्हणजे हा रस्ता बीओटी तत्वावर देण्यात आला असून सुप्रीम कंपनीतर्फे सध्या या रस्त्याची देखभाल दुरुस्ती व टोल वसुली करण्यात येत आहे. हा महामार्ग चिंचोटी येथे मुंबई अहमदाबाद महामार्गाला जोडत असून मानकोली येथे मुंबई नाशिक महामार्गाला जोडला जातो.

तसेच भिवंडीत या मार्गावर गोदाम पट्टा मोठ्या प्रमाणात विकसित झाला असल्याने या चिंचोटी मानकोली महामार्गावर अवजड वाहनांची नेहमीच वर्दळ सुरु असते. या माध्यमातून टोल कंपनीला मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा होत असतो मात्र आर्थिक फायदा होऊनही टोल वासून करणाऱ्या सुप्रीम कंपनीचे रस्त्याच्याया देखभाल दुरुस्तीकडे पुरता दुर्लक्ष होत आहे.

या रस्त्यावर नेहमीच मोठमोठे खड्डे असल्याने या महामार्गावर नेहमीच अपघात होत असून अनेकांना आपला जीव गमवावा लागत आहे. मात्र या रस्त्याची देखभाल करणाऱ्या सुप्रीम कंपनी त्यासंदर्भात काहीच देणं घेणं नसून केवळ आर्थिक नफा मिळविणे हे एकमेव उद्देश या टोल वसूल करणाऱ्या कंपनीने ठेवले आहे. विशेष म्हणजे राजकीय वरदहस्तामुळे सुप्रीम कंपनी स्थानिकांच्या गंभीर समस्येकडे व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुचनांकडे नेहमीच दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे हा रस्ता दुरुस्त करण्याचे आदेश शासनाने त्वरित सुप्रीम कंपनीला द्यावे अशी मागणी स्थानिक नागरिक करीत आहेत.

मीरारोडमध्ये पावसाचा पहिला बळी

मीरारोड - काशिमीरा भागातील पावसामुळे या ठिकाणी असलेली मीरा गावठाण मधील गायत्री सोसायटीत राहणारे राकेश धीरूभाई हरसोरा (47) यांचा बुधवारी नाल्यात बुडून मृत्यू झाला . तर वाहून जाणाऱ्या एकाला स्थानिकांनी वाचवले . संजयगांधी राष्ट्रीय उद्यानाला खेटून मीरा गावठाण - महाजनवाडीत डोंगरावरून पाण्याचा मोठा लोंढा येत असतो . सोमवार रात्री पासून पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे या ठिकाणी असलेली मोठ्या नाल्याची भिंत बुधवारी कोसळली व रस्ता खचला आहे.

येथील बैठ्या चाळीं मध्ये पाणी शिरले आहे . दोन दिवस घरात पाणी साचून असल्याने वीज पुरवठा खंडित केला गेला आहे. घरातील सामान आदी सर्व पाण्यात गेले आहे. जेवण बनवणे सुद्धा शक्य होत नसल्याचे रहिवाश्यांनी सांगितले. बुधवारी सकाळी देखील दोन रिक्षा आणि दुचाकी पाण्याच्या वेगामुळे नाल्यात वाहून गेल्या . तर वाहून जाणारी गाडी पकडण्यासाठी धावलेले राकेश हरसोरा देखील नाल्यात वाहून गेले .

भिवंडीत अल्पवयीन मुलीवर डॉक्टरने केला लैंगिक अत्याचार

भिवंडी - कोरोनाच्या महामारीत जगभर डॉक्टर रुग्णांचे प्राण वाचवत आहेत. मात्र, वैद्यकीय क्षेत्राला काळिमा फासणारी घटना भिवंडीत घडली आहे. 14 वर्षीय अल्पवयीन मुलीवर डॉक्टरने अत्याचार केला असल्याची खळबळजनक घटना भिवंडीत समोर आली आहे. याप्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात नराधम डॉक्टर विरोधात मंगळवारी पीडित अल्पवयीन मुलीच्या आईने तक्रार केली असता या नराधमावर विविध कालामांतर्गत अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आला आहे.30 जुलै रोजी 14 वर्षीय अल्पवयीन मुलगी तिची व तिच्या आईची तब्बेत बरी नसल्याने दोघीही गुलजार नगर येथील डॉ. बदरुजमा खान याच्याकडे उपचारासाठी गेल्या होत्या. यावेळी डॉक्टरने दोघींनाही तपासून व उपचार करून परत दुसऱ्या दिवशी तपासण्यासाठी बोलावले होते. दरम्यान दुसऱ्या दिवशी 31 जुलै रोजी मुलीची तब्बेत बरी नव्हती मात्र घरी काम असल्यामुळे मुलीच्या आईने तिच्या सोबत 10 वर्षाच्या मुलाला सोबत पाठवले होते. दुपारी 12 ते 1 वाजेच्या दरम्यान डॉ बदरुजमा खान याने मुलीचा तपासणीचा नंबर येऊनही तिला तपासले नाही . तिला सर्वात शेवटी तपासण्यासाठी बोलावले व दवाखान्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला देखील कामानिमित्त बाहेर पाठवले होते. मुलीच्या सिबत गेलेल्या लहान भावाला पैसे सुट्टे आणण्याच्या बहाण्याने घरी पाठवले होते. यादरम्यान दवाखान्यात कुणीही नसल्याचा फायदा उचलत या डॉक्टरने मुलीवर अत्याचार केला . सदर प्रकार पीडित मुलीने आपल्या मावशीला सांगितला असता मावशीला धक्काच बसला व तिने पीडित मुलीच्या आईला आपल्या घरी बोलावून सदरचा प्रकार कथन केला. याप्रकरणी मुलीच्या आईने घटनेच्या पाच दिवसा नंतर मंगळवारी 4 ऑगस्ट रोजी शांतीनगर पोलीस ठाण्यात नराधम डॉक्टरबाबत तक्रार केली.

"आयुष्यात पहिल्यांदाच पाहतोय"

दक्षिण मुंबईत साचलेलं पावसाचं पाणी पाहून शरद पवार आश्चर्यचकित

मुंबई : मुंबईत मुसळधार पाऊस सुरु असल्याने जनजीवन विस्कळीत झालं आहे. बुधवारी पहाटेपासून सुरु असलेल्या पावसामुळे मुंबईत दाणादाण उडवली. सखल भाग, रस्ते, रेल्वेमार्ग जलमय झाले आणि वाहतुकीचे सर्वच मार्ग पाण्याने रोखले. मंत्रालय परिसरातही रस्त्यांवर पाणी साचलं होतं. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मंत्रालय परिसरात साचलेलं पाणी पाहून आश्चर्य व्यक्त करत आयुष्यात पहिल्यांदाच पाहतोय अशी प्रतिक्रिया दिली आहे.

यशवंतराव चव्हाण सेंटरमधून घरी जात असताना सुप्रिया सुळे यांनी फेसबुक लाइव्ह केलं. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवारदेखील त्यांच्यासोबत गाडीमध्ये होते. लाइव्ह सुरु असताना सुप्रिया सुळे इतक्या पावसात या परिसरात पाणी भरलेलं आजपर्यंत पाहिलेलं नाही असं सांगत असून त्यावर शरद पवार पहिल्यांदाच आयुष्यात पाहतोय असं सांगत आश्चर्य व्यक्त करत आहेत. तर सुप्रिया सुळे समुद्रात आल्यासारखंच वाटत आहे असं म्हणत आहेत.

SAMYAK CORPORATION LIMITED
(Formerly Known as Green Commercial Limited)
CIN: L51219MH1985PLC265766
Room No. 18, Kailash Darshan, Hansoti Lane, Cama Lane, Ghatkopar Mumbai, Mumbai City Maharashtra- 400086
Website: www.greencommercial.in, Email id: roc.greencommercial@gmail.com

NOTICE

Pursuant to Regulation 29 and 47(1)(a) of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, Notice is hereby given that meeting of the board of directors of the company will be held on Friday, 14th August 2020 at 11:30 A.M, inter alia, to consider and approve the Standalone Unaudited Financial Results of the company for the Quarter ended 30th June, 2020.

The Intimation is also available on the website of the company (www.greencommercial.in) and on the website of the Stock Exchange (https://www.msei.in/)

For Samyak Corporation Limited
Sd/-
Kalpak Ajay Vora
Managing Director
DIN: 01556520
Place: Mumbai
Date : 06.08.2020

निधी ग्रेनाइट्स लिमिटेड
सीआयएन नं. : L51900MH1981PLC025693
नोंदणीकृत कार्यालय : ९, पोपट बापा शॉपिंग सेंटर, २ रा मजला, स्टेशन रोड, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई - ४०० ०५४.
ई-मेल आयडी : pushpraj0201@gmail.com
दूर. क्र. (०२२) ६४८ ५४८१
वेबसाइट : www.nidhigranites.com

सूचना

सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ चे विनियमन २९ सहवाचन विनियमन ४७ अंतर्गत याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, दि. ३०.०६.२०२० रोजी संपलेली पहिली तिमाही व तीनमहिन्याकरिता कंपनीच्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांवर विचारविनिमय करणे व त्यांना मंजुरी देण्याकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची सभा बुधवार, दि. १२.०८.२०२० रोजी दु. १२.३० वाजता त्यांचे नोंदणीकृत कार्यालय पत्ता ५०२, व्हिवेरिया डी विंग, साने गुरुजी मार्ग, महालक्ष्मी, मुंबई - ४०० ०११, महाराष्ट्र भारत या पत्त्यावर आयोजित करण्यात येत आहे.
वरील माहिती कंपनीची वेबसाइट, पळवहळसीरपळींशी.लो वर तसेच स्टॉक एक्सचेंज वेबसाइट, लीशळपवळर.लो वरही उपलब्ध आहे.
निधी ग्रेनाइट्स लिमिटेडकरिता
सही/-
निधी अगरवाल
व्यवस्थापकीय संचालक
मुंबई
०७.०८.२०२०

SPACEAGE PRODUCTS LIMITED
CIN: L34300MH1980PLC267131
B-702, Neelkanth Business Park, Near Vidyavihar Bus Depot, Vidyavihar (West) Mumbai City, Maharashtra-400086
Website: www.spaceageproducts.co.in, Email id: roc.spaceage@gmail.com

Notice

Pursuant to Regulation 29 and 47(1)(a) of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, Notice is hereby given that meeting of the board of directors of the company will be held on Friday, 14th August 2020, inter alia, to consider and approve the Standalone Unaudited Financial Results of the company for the Quarter ended 30th June 2020.

The Intimation is also available on the website of the company (www.spaceageproducts.co.in) and on the website of the Stock Exchange (https://www.bseindia.com/)

For and on behalf of
Spaceage Products Limited
Sd/-
Bhavesh Prabhudas Vora
Managing Director
DIN: 06814823
Place: Mumbai
Date: 06.08.2020

SLESHA COMMERCIAL LIMITED
(Formerly known as Shivam Techno Projects Limited)
CIN: L74140MH1985PLC266173
Room No. 18, Kailash Darshan, Hansoti Lane, Cama Lane, Ghatkopar Mumbai, Mumbai City, Maharashtra-400086
Website: http://www.shivamtechno.com/, Email id: roc.shivamtechno@gmail.com

NOTICE

Pursuant to Regulation 29 and 47(1)(a) of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, Notice is hereby given that meeting of the board of directors of the company will be held on Friday, 14th August, 2020 at 11:00 A.M, inter alia, to consider and approve the Standalone Unaudited Financial Results of the company for the Quarter ended 30th June 2020.

The Intimation is also available on the website of the company (www.shivamtechno.com) and on the website of the Stock Exchange (https://www.msei.in/)

For Slesha Commercial Limited
Sd/-
Nidhi Vora Kalpak
Managing Director
DIN: 05160902
Place: Mumbai
Date : 06.08.2020

इंडसोया लिमिटेड
सीआयएन : L67120MH1980PlC023332
नोंदणीकृत कार्यालय : १११११ - ए रहेजा चेंबर्स, २१३, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१.
ई-मेल : info@indsoya.com वेबसाइट : www.indsoya.com संपर्क क्र. : ०२२ - २२८५२७९६ - ९७ - ९९

दि. ३०.०६.२०२० रोजी संपलेल्या तिमाहीकरिताात्या स्थायी अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा सारांश (रु. लाखांत)

अ. क्र.	तपशील	तिमाहीअखेर (३०.०६.२०२०) अलेखापरीक्षित	तिमाहीअखेर (३१.०३.२०२०) अलेखापरीक्षित	तिमाहीअखेर (३०.०६.२०१९) अलेखापरीक्षित	वर्षअखेर (३१.०३.२०२०) लेखापरीक्षित
१.	परिचालनातून एकूण उत्पन्न (निव्वळ)	१०२.६८	७८.९९	२.४०	४४५.३९
२.	कालावधीकरिता (कर व अपवादात्मक व/वा असामान्य बाबीपूर्व)निव्वळ नफा /(तोटा)	११.०९	४.६१	३.५९	१९.२२
३.	करपूर्व कालावधीकरिता (अपवादात्मक व/वा असामान्य बाबीपश्चात)निव्वळ नफा/(तोटा)	११.०९	४.६१	३.५९	१९.२२
४.	करपश्चात कालावधीकरिता (अपवादात्मक व/वा असामान्य बाबीपश्चात)निव्वळ नफा/(तोटा)	८.२४	३.८८	३.५९	१६.१९
५.	कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता (करपश्चात) नफा/(तोटा) व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) यांचा समावेश)	८.२४	३.८८	३.५९	१६.१९
६.	प्रदानित भाग भांडवल	२०.००	२०.००	२०.००	२०.००
७.	राखीव (लेखापरीक्षित ताळेबंदानुसार पुनर्मूल्यांकन राखीव वगळता)				७१.९१
८.	उत्पन्न प्रतिशेअर प्रत्येकी रु.१०/- (असामान्य बाबीपश्चात)				
	अ) मूलभूत (रु.)	४.१२	१.९४	१.८०	८.१०
	ब) सौम्यीकृत (रु.)	४.१२	१.९४	१.८०	८.१०

टीप :
१) वरील वित्तीय निष्कर्षांची संचालक मंडळाद्वारे दि. ०५.०८.२०२० रोजी आयोजित सभेत पटनोंदणीकरण्यात आली.
२. वरील विवरण हे सेबी (सूची व अन्य विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल करण्यात आलेल्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे. सदर वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप स्टॉक एक्सचेंज वेबसाइट www.bseindia.com वर व कंपनीची वेबसाइट www.indsoya.com वर उपलब्ध आहे.
३. गत कालावधी/वर्षाकरिताची आकडेवारी आवश्यकतेनुसार पुनर्गठित/पुन:वर्गवारीत करण्यात आली आहे.
इंडसोया लिमिटेडकरिता
सही/-
शिवकुमार वैशी
कंपनी सचिव
ए४५५२८
ठिकाण : मुंबई
दिनांक : ०५.०८.२०२०

TV VISION LTD
A SRI ADHIKARI BROTHERS ENTERPRISE
CIN: L64200MH2007PLC172707
Regd Office: 4th Floor, Adhikari Chambers, Oberoi Complex, New Link Road, Andheri (West), Mumbai-400 053
E-mail : cs@tvvision.in; Website: www.tvvision.in
Tel.: 022-40230000; Fax: 022-26395459

NOTICE

Notice is hereby given in terms of Regulation 29 and 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, that a meeting of the Board of Directors of the Company will be held on Wednesday, August 12, 2020, through electronic mode, *inter alia*, to consider and approve the Standalone and Consolidated Un-Audited Financial Results of the Company for the quarter ended June 30, 2020. The information is also available on the website of the Company viz. www.tvvision.in and is also available on the website of BSE Limited (www.bseindia.com) and National Stock Exchange of India Limited (www.nseindia.com) where the shares of the Company are listed.

For TV Vision Limited
Sd/-
Shilpa Jain
Company Secretary & Compliance Officer
Place: Mumbai
Date: August 6, 2020

SAB EVENTS AND GOVERNANCE NOW Media Ltd
CIN: L22222MH2014PLC254848
Regd. Off.: 7th Floor, Adhikari Chambers, Oberoi Complex, New Link Road, Andheri (West), Mumbai - 400 053
E-mail: cs@governancenow.com; Website: www.governancenow.com
Tel.: 022 40230711; Fax: 022 26395459

NOTICE

Notice is hereby given in terms of Regulation 29 and 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, that a meeting of the Board of Directors of the Company will be held on Wednesday, August 12, 2020, through electronic mode *inter alia* to consider and approve the Un-audited Financial Results of the Company for the quarter ended June 30, 2020.
The information is also available on the website of the Company viz. www.governancenow.com and is also available on the website of BSE Limited (www.bseindia.com) and National Stock Exchange of India Limited (www.nseindia.com) where the shares of the Company are listed.

For SAB Events & Governance Now Media Limited
Sd/-
Swity Gada
Company Secretary & Compliance Officer
Place: Mumbai
Date: August 6, 2020

सिडको
शहरांचे शिल्पकार

शुद्धिपत्रक क्र. ४

नवी मुंबई मेट्रो लाइन १ च्या तळोजा येथे डेपो तथा वर्कशॉपमध्ये हाइट गेजेसची तरतूद करून प्रतिष्ठापनाचे कार्य

सिडको महामंडळातर्फे नवी मुंबई मेट्रो लाइन १ च्या तळोजा येथे डेपो तथा वर्कशॉपमध्ये हाइट गेजेसची तरतूद करून प्रतिष्ठापनाचे कार्य या शीर्षकांतर्गत दि. ५ ऑगस्ट २०२० रोजीच्या दैनिक द ग्लोबल टाइम्समध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली 'बोली मागविणारी सूचना' ही 'शुद्धिपत्रक क्र.३ (दुसरा विस्तार)' म्हणून तसेच सदर सूचनेमध्ये उल्लेख करण्यात आलेली वेबसाइट ही mahatenders.gov.in म्हणून वाचण्यात यावी. सदर बदलांची आणि अन्य अटी व शर्ती त्याच राहतील याची सर्व अर्जदारांनी कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

कार्यकारी अभियंता (एमआर-३)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०२३-क/२०२०-२१